तरुण भारत ▪ बुधवार, २५ मे २०२२

# हळबे विद्यालयात आजीवन अध्ययन कार्यक्रम



दोडामार्ग : प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. कुणाल जाधव व अन्य.

समीर ठाकुर

वार्ताहर
दोडामार्ग

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांना अनेक संधी प्राप्त केल्या आहेत. अनेक विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे मिळाले आहेत. विद्यार्थी स्वावलंबी बनविण्याचे कार्य या विस्तार विभागातून होत आहे. यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या विभागात सहभागी झाले पाहिजे, असे मत मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक प्रा. डॉ. कुणाल जाधव यांनी व्यक्त केले.

हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग वार्षिक मूल्यमापन या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी किरण पाटील, सचिन राऊत, गौतम गायकवाड, प्रशांत कांबळे व क्षेत्र समन्वयक प्रा. यु. टी. परब उपस्थित होते.

**प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचा सत्कार**

डॉ. कुणाल जाधव यांनी डी. एल. एल. ई. विभागाच्यावतीने राबविण्यात आलेले व येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचा डी. एल. एल. ई. विभागाच्यावतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. सुभाष सावंत यांनी या विभागाच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यशिक्षक प्रा. एस. एस. पाडगावकर यांनी केले, तर आभार प्रा. प्रीती प्रसादी यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील महाविद्यालयीन विस्तार कार्यशिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.